**राजाराम कॉलेज, कोल्हापूर येथे महिंद्रा प्राइड क्लासरूम यशस्वीपणे संपन्न**





कोल्हापूर :

**नांदी फाउंडेशन** यांच्या सहकार्याने राबविण्यात येणारा **महिंद्रा प्राइड क्लासरूम - "Employability with Empathy for Girls"** हा कौशल्यविकास कार्यक्रम **दिनांक ८ डिसेंबर ते १३ डिसेंबर २०२५** या कालावधीत **राजाराम कॉलेज, कोल्हापूर** येथे यशस्वीपणे पार पडला.

या कार्यक्रमात महाविद्यालयातील सुमारे **७४ विद्यार्थिनींनी सहभाग नोंदविला**. सदर प्रशिक्षणादरम्यान विद्यार्थिनींना रोजगारक्षमतेसाठी आवश्यक असलेली संवादकौशल्ये, आत्मविश्वास, व्यक्तिमत्त्व विकास, टीमवर्क तसेच व्यावसायिक कौशल्यांचे प्रभावी प्रशिक्षण देण्यात आले. सहभागी विद्यार्थिनींनी या कार्यक्रमाचा आनंद घेतला व त्यातून महत्त्वपूर्ण कौशल्ये आत्मसात केली.

सदर उपक्रमाचे आयोजन **प्लेसमेंट सेल, राजाराम कॉलेज, कोल्हापूर** यांच्या वतीने करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे **संयोजक श्री. अनिल मरळे** होते. महाविद्यालयाच्या **माननीय प्राचार्या डॉ. अनिता बोडके**

**मॅडम** यांनी सदर कार्यक्रमासाठी वेळोवेळी परवानगी देऊन तसेच अशा कौशल्यविकास उपक्रमांना नेहमीच प्रोत्साहन व प्रेरणा दिली.

या प्रकल्पासाठी **गोवा येथील मास्टर ट्रेनर सौ. श्रेया कुरणे मॅडम** यांनी प्रभावी प्रशिक्षण दिले. तसेच **नांदी फाउंडेशनच्या सौ. प्रेरणा शर्मा मॅडम** यांच्या पुढाकारामुळे हा उपक्रम महाविद्यालयात राबविण्याची संधी उपलब्ध झाली.

महिंद्रा प्राइड क्लासरूम प्रकल्पामुळे विद्यार्थिनींमध्ये आत्मविश्वास वाढीस लागून त्या भविष्यातील करिअरसाठी अधिक सक्षम झाल्या असून, हा उपक्रम अत्यंत यशस्वी व लाभदायक ठरला.